CNR-MHYA110022722023

| | | |
|---|---|---|
| प्राप्त दिनांक | : | ०९/१०/२०२३ |
| नोंदणी दिनांक | : | ०९/१०/२०२३ |
| निकाल दिनांक | : | ०४/०६/२०२६ |
| कालावधी | : | ०२व. ०७म.२६दि. |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी उमरखेड, यांचे न्यायालयात**

**(पिठासिन अधिकारी श्रीमती आर.ए.ए.खतीब)**

**कौटूंबीक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियमाअंतर्गत**

**(PWDVA) फौजदारी अर्ज क्र. ४९/२०२३** **निशाणी क्रमांक – १४**

१. संगीता गजानन जाधव,
वय – ३५ वर्षे, धंदा – घरकाम,

२. कु. पुनम गजानन जाधव,
वय – १४ वर्षे, धंदा – शिक्षण,
अ.पा.क. आई संगीता गजानन जाधव
रा. अकोली, ता. उमरखेड जि. यवतमाळ, .... **अर्जदार**

**विरुध्द**

१. रामजी दामला जाधव,
वय ५७ वर्षे, धंदा – शेती,

२. दत्ता रामजी जाधव,
वय – ५० वर्षे, धंदा – शेती,

३. बळीराम रामजी जाधव,
वय – ४५ वर्षे, धंदा – शेती,

४. सौ. आशा मोहन राठोड,

वय – सज्ञान , धंदा – घरकाम,

५. उषा जयवंत जाधव,
वय – सज्ञान, धंदा – घरकाम,

६. मंदा बळीराम जाधव,
वय – सज्ञान, धंदा – घरकाम,
गैरअर्जदार क्र. १, २, ३ व ६ रा. तिवरंग (जहांगिर), ता. महागांव, जि. यवतमाळ
गैरअर्जदार क्र. ४ रा. दिग्रस ता. दिग्रस जि. यवतमाळ
गैरअर्जदार क्र. ५ रा. सहस्त्रकुंड ता. उमरखेड जि. यवतमाळ .... **गैरअर्जदार**

---

| | | |
|---|---|---|
| अर्जदारातर्फे वकील | : | श्री. एन. डी. चांदले |
| गैरअर्जदारा क्र. १, २, ३,५ व ६तर्फे वकील | : | श्री. एस. ए. राठोड |
| गैरअर्जदारा क्र. ४ | : | एकतर्फा |

## न्यायानिर्णय

(दिनांक : ०४/०६/२०२६)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम १२ अन्वये गैरअर्जदार यांच्याकडून संरक्षण आदेश, पोटगी, घरभाडे व नुकसान भरपाई इत्यादी मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. अर्जदार हिचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :

अर्जदार हिचे पती गजानन रामजी जाधव हे दिनांक २३.०५.२००७ रोजी मयत झाले असुन गैरअर्जदार क्र.१ हे अर्जदार क्र. १ चे सासरे व अर्जदार क्र. २ यांचे आजोबा आहेत. गैरअर्जदार क्र. २ व ३ हे अर्जदार क्र. १ हिचे दिर असुन अर्जदार क्र. २ हिचे काका आहेत. गैरअर्जदार क्र. ४ व ५ ह्या अर्जदार क्र. १ हिच्या नणंद आहेत तर अर्जदार क्र. २ हिच्या आत्या आहेत. गैरअर्जदार क्र. ६ ह्या अर्जदार क्र. १ हिची जाऊ आहे तर अर्जदार क्र. २ हिची काकु आहे. अर्जदार हिचा विवाह मयत पती

गजानन रामजी जाधव यांचे सोबत दिनांक ०३.०४.२००५ रोजी अर्जदार हिच्या वडीलांच्या घरी मौजे आकोली ता. उमरखेड येथे जातीरिवाजा प्रमाणे झाला. सदर लग्न अर्जदार हिच्या वडीलांनी थाटामाटात लावुन दिले व लग्नामध्ये भरपुर खर्च केला. तसेच लग्नामध्ये गृहउपयोगी साहित्य सुद्धा दिले. विवाहानंतर अर्जदार ही एकत्र कुटुंबामध्ये नांदावयास गेली. अर्जदार व मयत गजानन रामजी जाधव यांचे विवाह संबंधातुन दिनांक २७.०८.२००७ रोजी एक मुलगी कु. पुनम ही जन्मास आली. अर्जदार हिचे पती मयत झाल्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी अर्जदार क्र. १ हिस घरातुन हाकलुन दिले. त्यानंतर अर्जदार ही तिचे वडीलासोबत तिचे माहेरी नाईलाजास्तव राहत आहे.

३. अर्जदार हिने गैरअर्जदार यांचे मौजे तिवरंग (जहांगिर) ता. महागांव जि. यवतमाळ येथील शेतजमीन दिनांक १८.०६.२०१४ रोजी वडीलांसोबत जाऊन पंचासमक्ष वाटुन ताब्यात मागितली. परंतु गैरअर्जदारांनी जमीन देण्यास नकार दिला त्यामुळे अर्जदार हिने गैरअर्जदार यांचे विरुद्ध रे.दि.मु.नं. २७/२०१४ दाखल केला. या दाव्याचा दिनांक १९.०७.२०२३ रोजी निकाल लागला. त्यानंतर अर्जदार ही निकालाप्रमाणे दिनांक ०३.०९.२०२३ रोजी शेतजमीन ताब्यात मागण्याकरीता गेली असता गैरअर्जदार क्र. १ ते ३ व ६ यांनी अर्जदार हिस धक्काबुक्की करुन घरातुन हाकलुन दिले व तु पुन्हा येथे यायचे नाही, आलीस तर जिवाने मारल्याशिवाय राहणार नाही असे म्हणुन अर्जदार हिस मारहाण करुन हाकलुन दिले.

४. अर्जदार क्र. १ व २ हे नाईलाजास्तव तिचे माहेरी वडीलांकडे मौजे आकोला, ता. उमरखेड येथे राहत असुन अर्जदार यांना कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. गैरअर्जदार यांचेकडे मौजे तिवरंग (जहांगिर) ता. महागांव येथे शेत स.नं. ९०, क्षेत्रफळ १ हे. २१ आर व शेत स.नं. ८७ क्षेत्रफळ २ हे. २७ आर. एवढी शेत जमीन असुन यातुन गैरअर्जदार हे वार्षिक खर्च वजा जाता रु. ५,००,०००/– उत्पन्न घेत असुन अर्जदार यांना कोणताही आर्थिक लाभ देत नाहीत. गैरअर्जदार क्र. ४ व ५ ह्या

गैरअर्जदार क्र. १ ते ३ व ६ यांची कानभरणी करीत असुन त्यांच्या सांगी व चिथावणीवरुनच अर्जदार हिस मानसिक, शारीरीक तसेच कौटुंबिक त्रास देत आहेत. गैरअर्जदार क्र. १ ते ६ यांनी अर्जदार हिचे पती गजानन जाधव हे मयत झाल्यानंतर गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ व २ यांना कोणतीही विचारपुस व चौकशी केली नाही. त्यामुळे अर्जदार क्र. १ व २ यांना गैरअर्जदारांनी आर्थिक लाभ, संरक्षण व निवासाची व्यवस्था करावी याकरीता अर्जदाराने सदरील अर्ज दाखल केला व तो मंजुर करण्यात आला.

५. गैरअर्जदार क्र. १ , २, ३, ५ व ६ हे सदरील प्रकरणात हजर होऊन सुद्धा त्यांनी त्यांचे लेखी म्हणने सादर केले नाही. म्हणुन त्यांच्या विरुद्ध सदरील प्रकरण विना जबाब चालवण्यात येत आहे तसेच गैरअर्जदार क्र. ४ याला समन्स तामिल हाऊन सुद्धा त्या सदरील प्रकरणात हजर न झाल्यामुळे सदरचे प्रकरण एकतर्फा चालविण्यात येत आहे.

६. प्रस्तुतचा अर्ज निकाली काढतांना खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणासह खालीलप्रमाणे देत आहे.

| अ. क्र. | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ वर कौंटुंबिक हिंसाचार केला हे तिने शाबीत केले आहे काय ? | होय. |
| २. | अर्जदार ही गैरअर्जदार यांच्याकडून संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? | होय. |
| ३. | सदर अधिनियमाचे कलम २२ नुसार अर्जदार ही | |

| | | |
|---|---|---|
| | तिच्यावर झालेल्या कौटुंबीक हिंसाचाराबद्दल नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे हे शाबीत करते काय ? असल्यास किती ? | नाही. |
| ४. | सदर अधिनियमाचे कलम २० नुसार अर्जदार ही मासिक पोटगी मिळण्यास पात्र आहे काय, असल्यास किती ? | होय.<br>अंतीम आदेशानुसार. |
| ५. | गैरअर्जदार अर्जदार हिच्या निवासाचे किंवा राहण्याची व्यवस्था करुन मिळण्यास अर्जदार पात्र आहे का ? | होय.<br>अंतीम आदेशानुसार. |
| ६. | गैरअर्जदाराने एकत्र कुटुंबाची शेतजमीन दि.दा. क्र. २७/१४ मध्ये दिनांक १९.०६.२०२३ रोजी झालेल्या निर्णयानुसार हिस्सा वाटुन ताबा मिळण्यास अर्जदार पात्र आहे का ? | नाही. |
| ७. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे. |

## <u>कारणमिमांसा</u>

७. अर्जदार संगीता गजानन जाधव (अ.सा.क्र.१) हिने तिचे सरतपासाचे शपथपत्र नि.क्र.१२ वर सादर करुन अर्जातील कथनाचा पुनरुच्चार केला आहे. तसेच, नि.क्र.१३ वर पुरसीस सादर करुन अर्जदाराने तिचा पुरावा बंद केला आहे. याउलट, गैरअर्जदार क्र.१ ते ६ यांना पुरेशी संधी दिल्यानंतरही त्यांनी त्यांचा पुरावा सादर केला नाही, म्हणुन त्यांचा पुरावा दिनांक २४/११/२०२५ रोजी निशाणी–१ वरील आदेशान्वये बंद करण्यात आला आहे.

<u>मुद्दा क्र.१ व २ साठी</u> –

८. अर्जदाराने तिचे पुराव्यात तिच्या निशाणी–१२ वरील शपथपत्राव्दारे अर्जाला सहाय्यभुत होईल असा पुरावा दिला आहे. अर्जदारांनी असे कथन केले की, अर्जदार क्र. १ हिचे पती गजानन रामजी जाधव हे दिनांक २३.०५.२००७ रोजी मयत झाले असुन गैरअर्जदार क्र.१ हे अर्जदार क्र. १ चे सासरे व अर्जदार क्र. २ यांचे आजोबा आहेत. गैरअर्जदार क्र. २ व ३ हे अर्जदार क्र. १ हिचे दिर असुन अर्जदार क्र. २ हिचे काका आहेत. गैरअर्जदार क्र. ४ व ५ ह्या अर्जदार क्र. १ हिच्या नणंद आहेत तर अर्जदार क्र. २ हिच्या आत्या आहेत. गैरअर्जदार क्र. ६ ह्या अर्जदार क्र. १ हिची जाऊ आहे तर अर्जदार क्र. २ हिची काकु आहे. अर्जदार हिचा विवाह मयत पती गजानन रामजी जाधव यांचे सोबत दिनांक ०३.०४.२००५ रोजी अर्जदार हिच्या वडीलांच्या घरी मौजे आकोली ता. उमरखेड येथे जातीरिवाजा प्रमाणे झाला. सदर लग्न अर्जदार हिच्या वडीलांनी थाटामाटात लावुन दिले व लग्नामध्ये भरपुर खर्च केला. तसेच लग्नामध्ये गृहउपयोगी साहित्य सुद्धा दिले. विवाहानंतर अर्जदार ही एकत्र कुटुंबामध्ये नांदावयास गेली. अर्जदार व मयत गजानन रामजी जाधव यांचे विवाह संबंधातुन दिनांक २७.०८.२००७ रोजी एक मुलगी कु. पुनम ही जन्मास आली. अर्जदार हिचे पती मयत झाल्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी अर्जदार क्र. १ हिस घरातुन हाकलुन दिले. त्यानंतर अर्जदार ही तिचे वडीलासोबत तिचे माहेरी नाईलाजास्तव राहत आहे.

९. अर्जदार हिने गैरअर्जदार यांचे मौजे तिवरंग (जहांगिर) ता. महागांव जि. यवतमाळ येथील शेतजमीन दिनांक १८.०६.२०१४ रोजी वडीलांसोबत जाऊन पंचासमक्ष वाटुन ताब्यात मागितली. परंतु गैरअर्जदारांनी जमीन देण्यास नकार दिला त्यामुळे अर्जदार हिने गैरअर्जदार यांचे विरुद्ध रे.दि.मु.नं. २७/२०१४ दाखल केला. या दाव्याचा दिनांक १९.०७.२०२३ रोजी निकाल लागला. त्यानंतर अर्जदार ही निकालाप्रमाणे दिनांक ०३.०९.२०२३ रोजी शेतजमीन ताब्यात मागण्याकरीता गेली

असता गैरअर्जदार क्र. १ ते ३ व ६ यांनी अर्जदार हिस धक्काबुक्की करुन घरातुन हाकलुन दिले व तु पुन्हा येथे यायचे नाही, आलीस तर जिवाने मारल्याशिवाय राहणार नाही असे म्हणुन अर्जदार हिस मारहाण करुन हाकलुन दिले.

**१०.** गैरअर्जदारांनी तिला घरातुन हाकलुन दिल्यापासुन तिच्या व तिच्या मुलीच्या खाण्या पिण्याची कपड्याची व निवासाची कोणतीही काळजी घेतलेली नाही. ती तेंव्हापासुन तिच्या माहेरी राहते. तिच्याकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. ती स्वतःचा व मुलीचा उदर्निवाह करण्यास असमर्थ आहे. अशा प्रकारे गैरअर्जदाराने तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केले.

**११.** गैरअर्जदारातर्फे अर्जदाराचा उलट तपास घेवुन तिच्या कथनाचे खंडण केलेले नाही. त्यामुळे, अर्जदार क्र.१ ने अर्जात केलेले कौटुंबिक हिंसाचाराबाबतचे कथन अबाधित राहिलेले आहे. गैरअर्जदारांनी त्यांचा पुरावा सादर करुन देखील अर्जदाराच्या कथनाचे खंडण केले नाही. अर्जदार हिचे पती मयत असुन गैरअर्जदार क्र. १ हे सासरे आहेत. कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा कलम *2(f) " Domestic relationship means a relationship between two persons who live or have, at any point of time, lived together in a shared household, when they are related by consanguinity, marriage, or through a relationship in the nature of marriage, adoption or are family members living together as a joint family;*

*2(q) "respondent" means any adult male person who is, or has been, in a domestic relationship with the aggrieved person and against whom the aggrieved person has sought any relief under this Act:*

Provided that an aggrieved wife or female living in a relationship in the nature of a marriage may also file a

complaint against a relative of the husband or the male partner.

वरील कलमावरुन हे सिद्ध होते की, अर्जदार हिचे पती जरी मयत असले तरी अर्जदार ही एकत्र कुटुंबात लग्नानंतर राहत होती व पतिच्या मृत्युनंतर घरातील कर्ता पुरुष या नात्याने सासरे ची जबाबदारी आहे व अर्जदाराला त्यांच्या विरुद्ध दाद मागण्याचा अधिकारी आहे. त्यामुळे, अर्जदारावर कौटुंबीक हिंसाचार झाल्याचे सिध्द होते. त्यामुळे, अशा परिस्थितीत, अर्जदारास गैरअर्जदारांपासून संरक्षण मिळावे याकरीता संरक्षण आदेश पारीत करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य राहिल. सबब, मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर होकाराथी देण्यात येत आहे.

<u>मुद्दा क्र. ३ साठी</u> –

**१२.** सदर अधिनियमाच्या कलम २२ नुसार गैरअर्जदारांनी अर्जदारावर कौटूंबीक हिंसाचार केला यासाठी तिला नुकसान भरपाई मंजुर करावी अशी विनंती अर्जदाराने केली आहे. परंतु, तिच्यावर झालेल्या कौटुंबीक हिसाचारामुळे तिचे कशा प्रकारे नुकसान झाले ही बाब अर्जदाराने अभिलेखावर आणली नाही, तसेच, त्याबाबतचा पुरावासुध्दा दाखल केला नाही. करीता, मुददा क्र. ३ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवीत आहे.

<u>मुद्दा क्र.४ साठी –</u>

**१३.** अर्जदार व तिच्या मुलीचे पालनपोषण करणे ही गैरअर्जदार क्र.१ ही सासरे या नात्याने कायदेशीर व नैतीक जबाबदारी ठरते. अर्जदाराने तिच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, अर्जदार क्र.१ पुढे असे कथन करते की, तिला गैरअर्जदार क्र.१ याने मारहाण करुन घरातुन हाकलुन दिल्यापासुन ती तिच्या माहेरी राहते. तेंव्हापासुन गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदारांच्या खाण्यापिण्याची, कपडालत्याची व इतर गरजांची सोय केली नाही. अर्जदार हे स्वतःचा सांभाळ करण्यास असमर्थ आहेत.

अर्जदार चे आईवडिल यांची आर्थिक परिस्थिती गंभीर असल्यामुळे तेदेखील अर्जदारांचा सांभाळ करण्यास असमर्थ आहेत. अर्जदार हिला उत्पन्नाचे कोणतेही साधने नाहीत. अर्जदार पुढे असे कथन करते की, गैरअर्जदार यांचेकडे मौजे तिवरंग (जहांगिर) ता. महागांव येथे शेत स.नं. ९०, क्षेत्रफळ १ हे. २१ आर व शेत स.नं. ८७ क्षेत्रफळ २ हे. २७ आर. एवढी शेत जमीन असुन यातुन गैरअर्जदार हे वार्षिक खर्च वजा जाता रु. ५,००,०००/– उत्पन्न घेतात परंतु त्याचा लाभ अर्जदारांना देत नाहीत. अर्जदार हिचे पती मयत असुन गैरअर्जदार क्र. १ सासरे असुन त्यांनी अर्जदार हिला तिच्या व तिच्या मुलीच्या खाण्यापिण्याची व राहण्याची सोय केल्याचा कोणताही पुरावा दाखल केलेला नाही.

**१४.** याउलट अर्जदार हिने दिवाणी दावा क्र. २७/२०१४ च्या न्यायनिर्णयाची प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. सदरील न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, शेत सर्वे नं. ९० क्षेत्रफळ १ हे २१ आर व शेत सर्वे नं. ८७ क्षेत्रफळ २ हे ८७ आर मौजे तिवरंग या शेत जमीनीमध्ये अर्जदार यांनी संयुक्तपणे १/७ हिस्सा देण्यात आला. परंतु सदरील हिस्सा गैरअर्जदाराने अर्जदार हिला वाटुण दिला किंवा नाही याबाबतचा कोणताही पुरावा गैरअर्जदाराने अभिलेखावर सादर केलेला नाही. अशा परिस्थितीत गैरअर्जदाराच्या नावे असलेली शेत सर्वे नं. ९० क्षेत्रफळ १ हे २१ आर व शेत सर्वे नं. ८७ क्षेत्रफळ २ हे ८७ आर मौजे तिवरंग ही जमीन संयुक्तीक आहे व या जमीनीमधुन मिळणाऱ्या उत्पन्नावर अर्जदार हिचे हक्क आहे. त्यावर गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार क्र. १ व २ यांना सदरील जमीनीत हिस्सा वाटप होऊन त्याचा स्वतत्र ताबा देईपर्यंत अर्जदार क्र. १ हिला त्यांच्या राहणीमानाप्रमाणे गैरअर्जदार क्र.१ चे संभावीत उत्पन्न व वाढती महागाई इत्यादी सर्व बाबींचा विचार करता अर्जदार क्र. १ हिला दरमहा १,५००/– रुपये (अक्षरी दोन हजार पाचशे रुपये) व अर्जदार क्र. २ याला दरमहा १,०००/– (अक्षरी एक हजार पाचशे रुपये) असे एकुण २,५००/– (अक्षरी दोन हजार पाचशे रुपये) गैरअर्जदार क्र.१ कडुन प्रस्तुत अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासुन पोटगी मिळण्यास

पात्र आहेत. करीता, मी मुद्दा क्र.४ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवीत आहे.

**<u>मुद्दा क्र.५ साठी –</u>**

**१५.** अर्जदारांनी असे कथन केले की, दिनांक २३.०५.२००७ रोजी अर्जदार क्र. १ चे पती मयत झाल्यानंतर अर्जदार हिला गैरअर्जदारांनी तिला घराबाहेर हाकलुन दिले तेंव्हापासुन ती माहेरी राहते. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदारांच्या राहण्याची व्यवस्था केलेली नाही. गैरअर्जदारांनी अर्जदार हिचया पतीच्या मृत्युनंतर तिच्या पतीच्या घरी राहु दिले नाही. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदार हिने गैरअर्जदार क्र. १ याचे कडे घर असल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केला नाही. परंतु अर्जदार क्र. १ व २ हे मयत गजानन जाधव यांचे पत्नी व मुलगी असुन गैरअर्जदार क्र. १ हे सासरे या नात्याने गैरअर्जदार क्र. १ याची जबाबदारी आहे की त्याने त्यांच्या राहण्याची तरतुद करावी. परंतु गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार यांच्या राहण्याची सोय केल्याबाबतचा कोणताही पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. तसेच, अर्जदार हिचे उलटतपास घेऊन तिच्या कथनांचे खंडन सुद्धा केलेले नाही. गैरअर्जदार क्र. १ याची नैतिक जबाबदारी असतांना सुद्धा त्याने अर्जदारांच्या राहण्याची व्यवस्था केलेली नाही. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार क्र. १ व २ यांना घरभाडे म्हणुन दरमहा १,५००/– रुपये देणे योग्य व न्यायोचित होईल म्हणुन मुद्दा क्र. ५ चे उत्तर अंशतः होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.६ साठी –</u>**

**१६.** अर्जदाराने असे कथन केले की, तिने गैरअर्जदारांना दिनांक १८.०६.२०१४ रोजी एकत्र कुटुंबाची जमीन वाटुन ताब्यात देण्याची मागणी केली होती परंतु गैरअर्जदारांनी शेतजमीन देण्यास नकार दिला त्यामुळे तिने रे.दि.दा. २७/२०१४ दाखल केला होता. त्या दाव्याचा निकाल दिनांक १९.०६.२०२३ रोजी

लागला असुन सदरील आदेशानुसार शेत सर्वे नं. ९० क्षेत्रफळ १ हे २१ आर व शेत सर्वे नं. ८७ क्षेत्रफळ २ हे ८७ आर मौजे तिवरंग या शेत जमीनीमध्ये अर्जदार यांनी संयुक्तपणे १/७ हिस्सा देण्यात आला. अर्जदार हिने तिच्या कथनाच्या पुष्टयार्थ अभिलेखावर रे.दि.मु. नं. २७/२०१४ निकालाची प्रत दाखल केलेली आहे. अर्जदार हिला सदरील जमीनीचा हिस्सा वाटुन ताबा देण्यात यावा अशी मागणी सदरील प्रकरणात केली आहे परंतु अर्जदार हिने सदरील दाव्याच्या निकालाच्या अनुशंगाने वेगळी कार्यवाही दाखल करुन हिस्सा वाटुन ताबा मिळण्याची मागणी करणे न्यायाचित होईल. अर्जदार हिला सदरील प्रकरणात रे.दि.मु. नं. २७/२०१४ निकाला नुसार हिस्सा वाटुन मिळण्याची मागणी करता येणार नाही म्हणुन मुद्दा क्र. ६ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

<u>**मुद्दा क्र.७ साठी –**</u>

**१७.** ज्याअर्थी, मुद्दा क्र.१ व २ वरील माझ्या निष्कर्षाच्या अनुषंगाने हे स्पष्ट होते की, अर्जदार ही संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहे, तसेच, अर्जदार क्र. १ हिला दरमहा १,५००/– रुपये अक्षरी एक हजार पाचशे व अर्जदार क्र. २ याला दरमहा १,०००/– अक्षरी एक हजार असे एकुण २,५००/– अक्षरी चार हजार रुपये फक्त, प्रस्तुत अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासुन पोटगी मिळण्यास पात्र आहेत. तसेच, अर्जदार हिला दरमहा १,५००/– घरभाडे मिळण्यास पात्र आहे. प्रस्तुत अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासुन गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदारांना कसल्याही प्रकारचा खर्च दिलेला नाही किंवा त्यांच्या पोटगीसाठी किंवा इतर खर्चासाठी काही रक्कम दिलेली नाही. प्रस्तुत अर्ज दाखल केल्यानंतर अर्जदार हिस न्यायालयात यावे लागले, अर्ज दाखल करुन वकीलांची फिस दयावी लागली. अशा परिस्थीतीत, प्रकरणाचा खर्च म्हणुन अर्जदार हिस रु.४,०००/– गैरअर्जदार क्र.१ ने द्यावेत असा आदेश पारीत करणे न्यायोचीत ठरेल. सदर पोटगी, घरभाडे व खर्च इत्यादी देण्याची जबाबदारी सर्वस्वी गैरअर्जदार क्र.१ याची ठरते. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदारांनी अर्जदारावर कसल्याही प्रकारे कौटूंबीक हिंसाचार करु नये असा संरक्षण आदेश पारीत करण्यात येत आहे.

३. गैरअर्जदार क्रं. १ याने अर्जदार क्र. १ हिला दरमहा १,५००/– रुपये (अक्षरी एक हजार पाचशे) व अर्जदार क्र. २ हिला दरमहा १,०००/– (अक्षरी एक हजार) असे एकुण २,५००/– (अक्षरी दोन हजार पाचशे) रुपये फक्त, प्रस्तुत अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासुन पोटगी रे.दि.मु. नं. २७/२०१४ निकालाच्या आदेशानुसार सर्वे नं. ९० क्षेत्रफळ १ हे २१ आर व शेत सर्वे नं. ८७ क्षेत्रफळ २ हे ८७ आर मौजे तिवरंग या शेत जमीनीमध्ये अर्जदार यांनी संयुक्तपणे १/७ हिस्सा वाटुण ताबा मिळेपर्यंत देण्यात यावा असा आदेश पारीत करण्यात येत आहे.

४. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदारांना दरमहा १,५००/–(अक्षरी एक हजार पाचशे फक्त) घरभाडे प्रस्तुत अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासुन रे.दि.मु. नं. २७/२०१४ निकालाच्या आदेशानुसार सर्वे नं. ९० क्षेत्रफळ १ हे २१ आर व शेत सर्वे नं. ८७ क्षेत्रफळ २ हे ८७ आर मौजे तिवरंग या शेत जमीनीमध्ये अर्जदार यांनी संयुक्तपणे १/७ हिस्सा वाटुण ताबा मिळेपर्यंत देण्यात यावा असा आदेश पारीत करण्यात येत आहे.

५. कौटुंबीक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियमाचे कलम २० (४) व कलम २४ प्रमाणे सदर न्यायनिर्णयाची प्रत ही अर्जदार क्र.१, गैरअर्जदार क्र.१ यांना मोफत देण्यात यावी. तसेच, सदर

न्यायनिर्णयाची प्रत संबंधीत पोलीस ठाणे अधिकारी व संरक्षण अधिका–याला पाठविण्यात यावी. (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

६. गैरअर्जदाराने अर्जदार क्र.१ हिला प्रकरणाचा खर्च म्हणुन ४,०००/– (अक्षरी चार हजार रुपये फक्त) द्यावे.

Digitally signed by RUBINA ANJUM AMJADUDDIN KHATEEB
Date: 2026.06.04 17:18:53 +0530

दिनांक ०४/०६/२०२६

**(आर.ए.ए.खतीब)**
न्यायदंडाधिकारी, वर्ग-१, उमरखेड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File order/judgment are same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | A. A. Dake |
| Name of Court | Smt.R.A.A.Khatib, Jt. C.J.J.D & J.M.F.C. Umarkhed |
| Date of Dictation | 04.06.2026 |
| Judgment signed by the P.O. on | 04.06.2026 |
| Judgment uploaded on | 04.06.2026 |